दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १३७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१० ऑगस्ट २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# तो पर्यंत संघर्षाची मशाल विझणार नाही

## १६ ऑगस्टपासून विमानतळाचे काम बंद आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**जो पर्यंत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव दिले जात नाही, तो पर्यंत संघर्षाची मशाल विझणार नाही, असा ईशारा आज जासई येथे झालेल्या मशाल मोर्चातून राज्य सरकारला देण्यात आला. १५ ऑगस्ट हि डेडलाईन आहे, या तारखेपर्यंत राज्य सरकारने प्रकल्पग्रस्तांच्या बाजूने सकारात्मक प्रतिसाद दिला नाही तर दिबासाहेबांच्या जन्मभूमीत प्रज्वलित करण्यात आलेल्या या मशालीचे रूपांतर १६ ऑगस्टपासून क्रांतीच्या वणव्यामध्ये करण्याचा निर्धार यावेळी प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी केला.**



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी ०९ ऑगस्ट अर्थात ऑगस्ट क्रांती दिनी जासई येथे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने मशाल मोर्चा झाला. नव्या मुंबईच्या निर्मितीसह देशातील शेतकरी आणि कष्टकऱ्यांसाठी लोकनेते दि. बा. पाटीलसाहेब यांनी केलेला संघर्ष व त्याग लक्षात घेऊन आणि भूमिपुत्रांच्या अस्तित्वाची ओळख जपण्यासाठी नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव द्यावे, ही मागणी समजून घेण्याऐवजी प्रकल्पग्रस्तांचा आवाज दाबण्याची भूमिका महाराष्ट्र सरकारने घेतली आहे. सरकारच्या या दडपशाहीचा निषेध करण्यासाठी लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जन्मगावापासून ठाणे, रायगड, पालघर, नवी मुंबई, मुंबईसह विविध जिल्ह्यांतील गावागावात जासई येथून मशाल प्रज्वलित करून नेण्यात आली. तत्पूर्वी या ठिकाणी सर्व उपस्थितांनी महापुरुष, हुतात्म्यांना तसेच लोकनेते दि. बा. पाटील यांना वंदन करून या मोर्चाला सुरुवात केली.

या मशाल मोर्चात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सल्लागार माजी खासदार जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी आमदार सुभाष भोईर, कॉम्रेड भूषण पाटील, दिबांचे चिरंजीव अतुल पाटील, पनवेलच्या महापौर कविता चौतमोल, उपमहापौर जगदिश गायकवाड, सभागृहनेते परेश ठाकूर, जे. डी. तांडेल, काँग्रेसचे प्रदेश सचिव संतोष केणे, गुलाब वझे, सरपंच संतोष घरत, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शहा, २७ गाव समितीचे नंदराज मुंगाजी, दशरथ भगत, मुंबई कृषी उत्पन्न बाजार



समितीचे संचालक राजेंद्र पाटील, अर्जुनबुवा चौधरी, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, उरण पंचायत समितीचे माजी सभापती नरेश घरत, साई संस्थान वहाळचे संस्थापक रवी पाटील, कामगारनेते सुरेश पाटील, राजेश गायकर, सीमा घरत, रुपेश धुमाळ, दीपक म्हात्रे, यांच्यासह कृती समितीच्या विविध शाखांचे पदाधिकारी, विविध पक्ष, संघटनांचे पदाधिकारी तसेच हजारो प्रकल्पग्रस्त भूमिपुत्र सहभागी झाले होते.

प्रकल्पग्रस्तांच्या एकतेची ताकद प्रचंड आहे, आणि ती सरकारला कळली सुद्धा आहे, मात्र नामकरणाचा एककलमी कार्यक्रम हाती घेऊन त्याचा घाट घालण्याचा प्रयत्न करताना त्याची जाणीव झाली नव्हती. १० जून भव्य मानवी साखळी आणि २४ जूनच्या सिडको घेराव आंदोलनातून सरकारची भंबेरी उडाली आहे, मात्र झोपेचे सोंग घेत राज्य सरकार कारभार करत प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांना डिवचण्याचे काम करीत असल्याचे दिसत आहे. मात्र खूप झाला अन्याय आता स्वस्थ बसायचं नाही, तर दिबांचे नाव आणि प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावल्याशिवाय माघार घायची नाही, असा गर्भित ईशारा या प्रज्वलित मशालीच्या माध्यमातून देण्यात आला. त्यानुसार विमानतळाचे काम बंद करण्यासाठी सोमवार १६ ऑगस्ट रोजी सकाळी ०९ वाजता ओवळे फाटा येथे जमणार भूमिपुत्र जमणार आहेत.

दिबांच्या नावासाठी उभारलेले हे आंदोलन सर्वपक्षीय आहे. सर्व पक्षातील लोकांचा, संघटनांचा दिबांच्या नावासाठी आग्रह आणि वाढता पाठिंबा असून दिबांच्या नावाला पर्याय नाही. मात्र हे सरकार अजून हुतात्मा करण्याच्या प्रयत्नात आहेत. दिबांचे नाव लागण्यासाठी सरकारला काय पाहिजे आहे. भूमिपुत्राला न्याय देण्यासाठी लढा उभारला आहे, समाजाला न्याय मिळालाच पाहिजे.

**- दशरथ पाटील**

दिबासाहेबांचे नाव लागल्याशिवाय हि ज्योत थांबणार नाही. या मशाल मोर्चातून चेतावणी दिली आहे. आतापर्यंत शांततेच्या मार्गाने आंदोलने झाली, मात्र आता तसे होणार नाही १५ ऑगस्ट डेडलाईन दिली आहे तो पर्यंत सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद आला नाही तर जे काही होईल ते होऊ द्या दुसरी क्रांती झाली तरी चालेल १६ ऑगस्ट पासून विमानतळाचे सर्व काम बंद पाडू. लोकनेते दि. बा. पाटील यांचे विमानतळाला नाव आणि प्रकल्पग्रस्तांचे सर्व प्रश्न निकाली लागेपर्यंत संघर्ष करत राहणार.

**- लोकनेते रामशेठ ठाकूर**

आपल्या सर्वांना दिबासाहेबांचा वारसा पुढे चालवायचा आहे. हि संघर्षाची, त्यागाची भूमि आहे. १६ जानेवारी १९८४ ला ऐतिहासिक लढा दिबासाहेबांच्या नेतृत्वाखाली झाला. आता १६ ऑगस्टला क्रांतीला पुन्हा सुरुवात होणार आहे. मशाल पेटली आहे राज्य सरकारने आता तरी जागे व्हावे कारण मागील दोन्ही आंदोलनापेक्षा आता होणारे आंदोलन मोठे असणार आहे. दिबासाहेबांचे नाव विमानतळाला मिळेल त्या दिवशी भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळण्याची सुरुवात होईल. त्यामुळे आंदोलन कितीही वर्षे चालू द्या नाव मिळेपर्यंत संघर्षाचा लढा सुरूच राहील.

**- आमदार प्रशांत ठाकूर**

# एसआरए प्रकल्प रखडवणाऱ्या बिल्डरांना दणका ; राज्य सरकारची मोठी घोषणा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

बिल्डरांनी गृहनिर्माण प्रकल्प रखडवल्यामुळं बेघर झालेल्या व वर्षानुवर्षे स्वत:च्या खिशातून भाडे देऊन राहणाऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. बिल्डरांनी रखडवलेले गृहनिर्माण प्रकल्प एसआरए ताब्यात घेणार असल्याची घोषणा गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे.

मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. 'झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाकडून गृहनिर्माण प्रकल्पासाठी इरादा पत्र घेऊन आणि बँका व वित्तसंस्थांकडून कर्ज घेऊन अनेक बिल्डरांनी प्रकल्प पूर्ण केलेले नाहीत. एसआरएच्या नावानं असे ५०० हून अधिक प्रकल्प सध्या रखडलेले आहेत. एलओआय पाहून बँका व वित्तसंस्थांनी त्यात गुंतवलेले पैसे व बंद पडलेले प्रकल्प यांचा हिशेब केल्यास सुमारे ५० हजार कोटी यात गुंतलेले आहेत. दुसरीकडं अनेक झोपडपट्ट्यांतील घरं अर्धी तुटलेली आहेत. हजारो लोक रस्त्यावर आहेत. त्यांच्या पुनर्वसनासाठी एसआरएनं रखडलेले प्रकल्प ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला आहे. हे प्रकल्प ताब्यात घेऊन गोरगरिबांच्या पुनर्वसनाचं काम केलं जाईल. शिवशाही पुनर्विकास प्रकल्प या कंपनीच्या मार्फत त्यासाठी निधीचं नियोजन केलं जाईल,' असं आव्हाड यांनी सांगितलं. त्याचबरोबर, प्रकल्पाचा एलओआय घेऊन दहा-दहा आणि १५-१५ वर्षे त्याच्या जिवावर मजा मारणं यापुढं चालू दिलं जाणार नाही. यापुढं एलओआय घेतल्यानंतर काम सुरू करण्यासाठी ठराविक वेळेची कायदेशीर मर्यादा घातली जाईल,' असंही आव्हाड यांनी सांगितलं.



'काही बिल्डरांनी खासगी वित्त संस्थांकडून ५०० आणि हजार कोटी रुपये घेतले आहेत. ते बिल्डर आता प्रकल्पांकडं बघायलाही तयार नाहीत. त्यामुळं एसआरएमध्ये पैसा येणं कमी होऊ लागलं आहे. पुढच्या प्रकल्पाला लागणारा पैसा थांबलाय. गरिबांची घरं रखडलीत. हे एक दुष्टचक्र झालंय,' असं आव्हाड म्हणाले. 'आर्थिक कारणांव्यतिरिक्त इतर कारणांमुळं रखडलेल्या प्रकल्पांच्या बाबतीतही एसआरए आता निर्णय घेईल. त्याबाबत दिरंगाई होणार नाही. गोरगरिबांच्या घरांच्या बाबतीत कुठलीही तडजोड होणार नाही. प्रकल्प ताब्यात घेण्याच्या आमच्या निर्णयाविरोधात बिल्डर कोर्टात गेले तर आम्हीही कोर्टात जाऊ,' असंही आव्हाड यांनी सांगितलं.

# बोरघर येथील पॉली हाऊसमुळे वावे धरणाचे पाणी दुषित

## पंचक्रोशीतील नागरिकांचे आरोग्य धोक्यात



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील वावे धरणातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आजूबाजूच्या परिसरातील गावांना होतो. यामध्ये वावे, बोरघर, सोनसडे भानंग, पाचघर, कळमशेत या गावांचा समावेश होत असून यावर्षी धरणाचे पाणी गढूळ झाले असून पिण्यालायक राहिलेले नाही. ते आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे या गावातील नागरिकांना ऐन पावसाळ्यात पायपीट करून पाणी दूरवरून डोक्यावर आणावे लागत आहे.

प्रतीवर्षी पाऊस मोठ्या प्रमाणात पडुन देखील हि समस्या उद्भवली नव्हती मात्र या वर्षी ही गंभीर समस्या कशी निर्माण झाली याचा शासनाने परीक्षण करणे गरजेचे झाले असून धरणा लगत समोर आलेल्या बिल्डरने जवळपास १०० एकर जागा घेऊन पॉली हाऊस नर्सरी निर्मिती करताना संपूर्ण डोंगरावरील झाडांची कत्तल करून जमिनीचे उत्खननात प्रचंड प्रमाणात चालू आहे. त्यामुळे सर्व माती धरणात वाहून आली आहे व झाडी तोडल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होऊन वावे धरणांमध्ये सर्व माती वाहून येवून पाणी पिण्या योग्य राहीलेले नाही. धरणा लगत गावांना पाणी .../२

# विजेचा धक्का बसून फार्म हाऊसमधील मजुराचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । महाड**

विजेचा झटका बसल्याने फार्म हाऊसमध्ये काम करणाऱ्या साठ वर्षीय मजुराचा मृत्यु झाला. कोल गावालगत असलेल्या एका फार्म हाऊसमध्ये घडली.

दगडू गुणाजी धोंडगे (वय ६०, रा. कोल , ता. महाड ) असे या घटनेत मरण पावलेल्या इसमाचे नाव आहे. महाड शहरातील महावीर एम्पोरियमच्या मालकांचे कोल येथे फार्म हाऊस आहे. रविवारी दगडू धोंडगे या फार्महाऊसमधील गवत काढण्याचे काम करित होते. हे काम करत असतानाच दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास त्यांच्या हाताचा स्पर्श एका पत्र्याला झाला. या पत्र्यात वीज प्रवाह असल्यामुळे त्याना विजेचा जोरदार झटका बसला.

सायंकाळी उशिरापर्यंत दगडू धोंडगे घरी परतले नाहीत म्हणून त्यांचे कुटुंबिय .../२

## संक्षिप्त...

### कोरोनाच्या दुसऱ्या लाटेतील मृत्यूसंख्येचा निचांक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आज करोनाच्या दैनंदिन रुग्णसंख्येत मोठी घट झाली असून मृत्यूंची संख्याही घसरली आहे. आज दिवसभरात ६८ रुग्णांचा मृत्यू झाला असून करोनाच्या दुसऱ्या लाटेतील हा निचांक आहे. तसेच आज एकूण ४ हजार ५०५ नव्या करोना बाधित रुग्णांचे निदान झाले आहे. या बरोबरच आज एकूण ७ हजार ५६८ इतके रुग्ण बरे झाले आहेत.

आज राज्यात झालेल्या ६८ रुग्णांच्या मृत्यूंनंतरही मृत्यूदर मात्र गेल्या काही दिवसांपासून २.०१ टक्क्यांवरच स्थिरावला आहे. याबरोबर राज्यात आतापर्यंत एकूण ६१ लाख ५१ हजार ९५६ रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९६.७६ टक्के इतके झाले आहे. राज्यातील एकूण सक्रिय रुग्णांची संख्येत ६८ हजार ३७५ इतकी आहे. राज्यातील सक्रिय रुग्णांचा जिल्हानिहाय विचार करता पुणे जिल्ह्यात सक्रिय रुग्णांची संख्या सर्वाधिक आहे. पुणे जिल्ह्यात हा आकडा १४ हजार १४९ इतका आहे.

# नागोठणे प्रा. आ. केंद्रात टी.टी. व श्वान दंश इंजेक्शनचा तुटवडा

**दै.रायगड नगरी । वाकण**

धनुर्वात व इतर काही महत्वाच्या प्रसंगी देण्यात येणारे टी.टी. इजेक्शन तसेच श्वान दंशावर लागणारे इंजेक्शन यांचा नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात सध्या तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे टी.टी. चे इंजेक्शन घेण्यासाठी नागोठणे प्रा. आ. केंद्रात येणाऱ्या रुग्णाला मेडिकल स्टोअर्स मधून हे इंजेक्शन आणावे लागत असुन त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्र हे रायगड जिल्ह्यातील महत्वाचे मध्यवर्ती असे आरोग्य केंद्र आहे. मुंबई गोवा महामार्गावरील अपघातग्रस्तांसाठीही हे महत्वाचे आरोग्य केंद्र आहे. त्यामुळेच या आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांची संख्याही खुप मोठी आहे. नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात पावसाळ्यातील साथीचे आजार, सर्प दंश व इतर औषधांचा पुरवठा मुबलक आहे. मात्र गेल्या सहा ते सात महिन्यांपासून या आरोग्य केंद्रात टी.टी. च्या इंजेक्शनचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्याचप्रमाणे शहर व परिसरात वाढलेली कुत्र्यांची संख्या पाहता येथे दररोज कुणाला ना कुणाला तरी श्वान दंश होण्याच्या घटना घडत असतात. असे असूनही श्वान दंशावर लागणारे इंजेक्शनही येथे नियमित मिळत नसल्याने त्याचाही इथे अधुन मधून तुटवडा निर्माण होत आहे. यावर जिल्हा .../२

# स्थानिक निवडणुकांमध्ये परिस्थिती बघूनच आघाडीबाबत निर्णय : आ.नवाब मलिका

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आगामी महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. पण, महाविकास आघाडीत काँग्रेसनंतर आता राष्ट्रवादीनंही स्वबळाचा नारा दिला आहे. आगामी निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी होईलच असं नाही. आम्ही स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊनच निवडणुकांना सामोरं जाणार आहोत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढवल्या पाहिजेत, अशी कुठल्याही पक्षाची भूमिका नाही, अशी प्रतिक्रिया राज्याचे अल्पसंख्याक मंत्री आणि राष्ट्रवादीचे प्रवक्ते नवाब मलिक यांनी दिली आहे.



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काँग्रेस स्वबळावर लढणार असल्याचं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले अनेकदा म्हणाले आत. त्यांच्या या वक्तव्यानंतर राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या अनेक नेत्यांनी त्यांच्यावर टीका केली. पण, आता स्वतःचे प्रवक्ते नवाब मलिक यांनीच स्वबळाचा नारा दिला आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असले तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका एकत्र लढवल्या पाहिजेत अशी कुठल्याही पक्षाची भूमिका नाही, असं वक्तव्य नवाब मलिक यांनी केलं आहे.

तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत स्थानिक लोक निर्णय घेतील आणि त्यानुसार पक्षाची भूमिका राहणार आहे. तिन्ही पक्ष विरुद्ध भाजप अशीच लढत सर्व ठिकाणी होणार अशी परिस्थिती नाही. काही ठिकाणी भाजपचे अस्तित्व नाही, त्यामुळे काही .../२

# कोकणातील रस्त्यांसाठी १०० कोटी ; प्रविण देरकर यांनी घेतली नितीन गडकरींची भेट

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पुरामुळे उध्वस्त झालेल्या कोकणातील रस्त्यांसाठी १०० कोटींचा निधी केंद्र सरकारच्यावतीने देण्याचे आश्वासन केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितिन गडकरी यांनी दिल्याची माहिती विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते प्रविण दरेकर यांनी दिली.

महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरामध्ये कोकणातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांमधील रस्त्यांची अतिशय दुरावस्था झाली आहे. कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील पूरग्रस्त भागांची केलेल्या दौऱ्याची व तेथील



पूरस्थितीची माहिती केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांना दिली. अनेक भागातील रस्ते पुराच्या पाण्यामुळे वाहून गेले आहेत, .../२

# पूजा चव्हाणच्या लग्नाचा भार अभिनेत्री दीपाली सय्यद यांनी उचलला

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

किती गोंडस मुलगी आहे, बाळ महापूर व दरडीत तुझं घर संसार उध्वस्त झालं असले तरी मुळीच चिंता करू नकोस, खंबीर रहा, मी तुझ्या पाठीशी आहे असं म्हणत अभिनेत्री दीपाली सय्यद यांनी सुतारवाडी या दरडग्रस्त भागातील पूजा चव्हाण व कुटुंबियांना मदतीचा हात व आधार दिला. तसेच पुजाच्या लग्नाचा सर्व खर्च देखील उचलणार असल्याचे म्हटले आहे.



२२ जुलै ची भयाण रात्र शेकडो कुटुंबांना उध्वस्त करणारी ठरली. जल प्रकोपाने अनेकांचे संसार मोडून पडले, दरड व महापुरात जिव वाचलेले लोक आता पुढे जगावे की मरावे या विवंचनेत आहेत. .../२

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक बांधिलकी जपणारा तिकीट चेकिंग परिवार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

महाड, खेड, चिपळूण पूरग्रस्तांना एक हात मदतीचा या माध्यमातून मध्य रेल्वेतील मुंबईतील तिकिट चेकिंग स्टाफने मदतनिधी उभारून पूरग्रस्तांचे दुःख थोडसं हलकं करण्याचा प्रयत्न केला. महाड तालुक्यातील सवाद माध्यमिक विद्यालय, महाड आणि श्री छत्रपती माध्यमिक,उच्च माध्यमिक विद्यालय, वरंध, महाड शाळेतील पूरग्रस्त गरजू-गरीब विद्यार्थ्यांना इ.५ ते १० (सेमी इंग्रजी) शालेय पुस्तकांचं वाटप करण्यात आले.



तसेच चिपळूण येथील कळंबस्ते, पवारवाडी, माळेवाडी, खेर्डी, खतातेवाडी, महाडमध्ये मोहोप्रे, वरंध, रामदास पठार, सुनेभाऊ गाव, पारमाची बौद्धवाडी, शंभू नगर, खेड दुर्गम भागांतील अनेक गावे आजही मदतीच्या प्रतीक्षेत असलेल्या गावी स्थानिकांच्या मदतीने पूरग्रस्तांच्या गरजा लक्षात घेऊन नियोजनबद्ध पद्धतीने जीवनावश्यक वस्तूंचे २५० किटचे वाटप करण्यात आले.

वरंध ते रामदास पठार दुर्गम,भूसखलन भागात प्रत्यक्ष जाऊन जीवनावश्यक वस्तूंचं वाटप केलं.वरंध-रामदास पठार दुर्गम भागात जागोजागी दरड कोसळण्याच्या घटना घडल्याने दळणवळणाची साधनं नसल्याने तेथील नागरिक मदतीच्या प्रतिक्षेत होते.याची माहिती मिळाल्याने त्यांच्या पर्यंत आम्हांला पोहचता आलं. मदतवस्तू स्विकारताना ते भावूक झाले होते.

तिकिट चेकिंग परिवारचे अध्यक्ष संजय आंग्रे, सचिव डी व्ही चिंदरकर, कार्याध्यक्ष राजन सुर्वे, हरिश्चंद्र मोंडकर, गिरीश कदम, विकास पाटील, राम खाटपे, हरिश दहिलकर, चंद्रशेखर रासम, सुभाष रहाटे, प्रमोद मोरे, रविंद्र बिरवटकर, प्रसाद करलकर, गणेश रसाळ व श्याम भागवत या सर्वांनी प्रत्यक्ष जाऊन दिनांक ०४ व ०५ ऑगस्ट रोजी वाटप केले.

# एम.आय.डी.सी प्रकल्पाबाधित शेतकऱ्यांची भुमिका शासनाकडे मांडणार: आ.रविंद्र पाटील

**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा मार्फत पेण तालुक्यातील डोळवी औद्योगिक विकास क्षेत्रासाठी काराव-गडब, डोलवी, वडखळ बोरी ग्रामपंचायत परिसरातील जमिन संपादित करण्यात येणार आहे. या भुसंपादनाला येथील शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असुन भुसंपादन रद्द करावे या मागणीसाठी पेण विधानसभा मतदार संघाचे आमदार रविंद्र पाटील यांची भेट घेतली व येथील शेतकऱ्यांचा या भुपादनाला विरोध असुन याबाबतीत चर्चा केली व ही बाब शासन दरबारी मांडावी व हे भुसंपादन रद्द करावे या मागणीचे निवेदन त्यांना दिले.

या विषयी संबंधित अधिकारी मंत्री यांच्याकडे बैठक लावून या भूसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध आहे या बाबत लवकरच चर्चा घडवुन शेतकऱ्यांची भूमिकाृशासनाकडे मांडण्यात येईल असे आमदार रविंद्र पाटील यांनी या वेळी सांगितले.

या वेळी काराव-गडब ग्रामपंचायतीचे उपसरपंच लक्ष्मण कोठेकर, माजी उपसरपंच तुलशिदास कोठेकरस, संजय पाटील, सिताराम चवरकर, के. जी. म्हात्रे, प्रशांत म्हात्रे, प्रमोद पाटील, सदानंद ठाकुर, प्रकाश ठाकुर, प्रभाकर पाटील, प्रविण म्हात्रे आदि शेतकरी उपस्थित होते.


**जाहिर नोटिस**

कै. सुरज ज्ञानेश्वर भोजने यांचे निधन दिनांक 07/11/2020 रोजी झाले असून त्यांच्या मालकीची दोन्ही वाहन क्रं खालील प्रमाणे

1) Vesical Regn. No. : MH-46-F- 7864 | Regn. Date : 06/03/2012 | Manufacturer : ASHOK LEYLAND AND LTD | TRUCK Open Body | Model No. TUSKER 2516 XL BSIII | Goods Carrier TR - Diesel | Cassi No. MB1CTDYC1CPBD344 | Engine No. BCP129621

2) Vesical Regn. No. : MH-46-BF- 7899 | Regn. Date : 08/10/2019 | Manufacturer : ASHOK LEYLAND AND LTD | Model No. 1618 / 1 NP Brown Colour | Goods Carrier | TR - Diesel | Cassi No. MB1A3CHD2JEWC3410 | Engine No. JWEZ438001 |

वरील दोन्ही वाहन माझे मुलाच्या नावावरून असून, माझे नावे किंवा विक्री करण्याचे आम्ही ठरविले आहे. सदर वाहन माझे नावावर किंवा विक्री करीता जर कोणाची हरकत असल्यास, हि जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील पत्त्यावर संपर्क करावा.

श्री. ज्ञानेश्वर मारुती भोजने मो.

दिनांक 10/08/2021

पत्ता : FL - 104, Wing F1, S.No. 401/1, Kanpoli Village, Taloja, Taluka - Panvel, Raigad, Maharashtra - 410208


# पथदिवे चालु करा : मनसे

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात मागील अनेक दिवसांपासून रस्त्यांना प्रकाशमय करणारे पथदिवे बंद अवस्थेत आहेत. रात्रीच्या वेळेस वाटसरू व वाहनचालकांना अत्यंत उपयुक्त ठरणारे पथदिवे चालु नसल्यामुळे अडचणी येत आहेत. सुधागड तालुक्यातील हे पथदिवे चालु करावेत अशी महत्वपूर्ण मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पाली सुधागड विजवीतरण विभागाकडे केली आहे. या मागणीचे निवेदन पाली महावितरण कार्यकारी उपअभियंता जतीन पाटिल यांना सोमवारी दि.(९)रोजी देण्यात आले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## बोरघर येथील पॉली हाऊसमुळे वावे धरणाचे पाणी दुषित

पुरवठा करणाऱ्या विहिरीतील पाणी गढुळ होऊन अतिशय खराब झाले आहे. आंघोळीसाठी वापर केला तरी खाज खरूज त्वचा रोग होण्याचा प्रादुर्भाव होत आहे. शासनाकडून पर्यावरण उत्खननाच्या परवानग्या कश्या दिल्या आणि किती दिल्या. रॉयल्टी किती भरली. अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली जात आहे. अशा प्रकारच्या पर्यावरणावर आणि मानवी जीवनावर परिणाम करणारे प्रकल्प उभे करताना पर्यावरणाला धोका तर निर्माण होत नाही परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार तर नाही ना याचा विचार शासनाने करणे आवश्यक होते. सद्यस्थितीत फिल्ट्रेशन प्लॅन्ट नसल्याची माहिती प्राप्त झाली असून या परिस्थितीची पाहणी संबधीत विभागाने करुन या पॉलीहाऊस मालकावर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

## विजेचा धक्का बसून फार्म हाऊसमधील मजुराचा मृत्यू

त्यांना पाहण्यासाठी फार्म हाऊसमध्ये गेले असता दगडू यांचा मृतदेह त्याना आढळला. एक जिवंत वीज वाहक तार या पत्र्यावर पडली होती. तारेतील वीज प्रवाह पत्र्यात उतरल्याने ही घटना घडल्याचे समोर आले आहे.

फार्म हाऊसमध्ये दगडू धोंडगे एकटेच काम करित होते. महापुरामुळे अनेक ठिकाणी वीजवाहक तारा तुटून पडल्या आहेत. फार्म हाऊस मालकाने खबरदारी म्हणून या ठिकाणी आणखी मजूर ठेवले असते तर कदाचित वेळेवर उपचार मिळून दगडू धोंडगे यांचे प्राण वाचविणे शक्य होते. घटनेची नोद महाड शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास सुरु आहे.

## नागोठणे प्रा. आ. केंद्रात टी.टी. व श्वान दंश इंजेक्शनचा तुटवडा

रुग्णालयाकडून लवकरात लवकर योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

यासंदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, टी. टी. च्या इंजेक्शनचा पुरवठा राज्य सरकारच्या आरोग्य विभागाकडूनच गेल्या काही महिन्यांपासून कुठेही होत नसल्याने सध्या या इंजेक्शनचा तुटवडा आहे. तर श्वान दंशावर लागणारे इंजेक्शन सध्या कमी प्रमाणात येत असले तरी या दोन्ही इंजेक्शनचा पुरवठा होण्यासाठी लवकरात लवकर उपाययोजना करण्यात येईल असेही डॉ. मोरे यानी स्पष्ट केले.

## स्थानिक निवडणुकांमध्ये परिस्थिती बघूनच आघाडीबाबत निर्णय

ठिकाणी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस समोरासमोर लढतील. काही ठिकाणी राष्ट्रवादी-शिवसेना लढत होणार आहे. ज्याठिकाणी दोन पक्षाची, तीन पक्षाची आघाडी करायची गरज असेल किंवा स्वबळावर लढण्याची गरज असेल ती परिस्थिती बघून निर्णय होणार असल्याचं नवाब मलिक यांनी स्पष्ट केलं आहे.

## प्रविण देरकर यांनी घेतली नितीन गडकरींची भेट

त्यामुळे सर्व रस्त्यांच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी आज दिल्लीमध्ये केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितिन गडकरी यांना सविस्तर निवेदन दिले. कोकणातील उध्दवस्त झालेल्या रस्त्यांसाठी निधी देण्याची विनंती गडकरी यांच्याकडे केल्याचे दरेकर यांनी सांगितले. यावेळी गडकरी यांनी ही विनंती मान्य करीत कोकणासाठी केंद्र सरकारच्यावतीने १०० कोटींचा निधी देणार असल्याचे आश्वासन दिले आहे. गडकरी यांच्या या सहकार्यामुळे कोकणवासियांना मोठा दिलासा मिळणार असल्याची माहिती विरोधी पक्ष नेते प्रविण दरेकर यांनी दिली.

## पूजा चव्हाणच्या लग्नाचा भार अभिनेत्री दीपाली सय्यद यांनी उचलला

पोलादपूर साखर सुतारवाडी येथील दरडीमध्ये चव्हाण कुटूंबीयांची आयुष्य भरांची पुंजी हिरावून नेली. दरड व महापुराच्या संकटात आपल्या झोपडीत काहीच शिल्लक राहणार नाही याची खात्री असल्याने चव्हाण कुटुंबाने एका सुताराच्या घरी दागिने ठेवण्यास दिले. मात्र ते घर दरडी खाली आले, अन सारे संपून गेले, बाप अपंग असल्याने आता पुन्हा हे दागिने कसे जमविणार, मुलीच्या लग्नाच काय होणार? या विचारांनी अन अश्रूंनी आईच्या मनात घर केलं होत. वा या अपेक्षेत असलेल्या या चव्हाण कुटुंबाला अभिनेत्री दीपाली भोसले सय्यद यांनी प्रत्येक्ष भेटून मोठा आधार दिलाय. त्यांनी या मुलीच्या लग्नात सर्व मदत करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. दीपाली भोसले सय्यद चॅरिटेबल ट्रस्ट च्या माध्यमातून पूजा चव्हानच्या लग्नातील दागदागिने व संपूर्ण खर्च उचलणार असल्याची ग्वाही सय्यद यांनी दिलीय. या कुटुंबाला जीवनावश्यक साहित्य देखील या भेटीत दिलं. त्यामुळे या चव्हाण कुटुंबाला आता जगण्याची उमेद मिळाली असून त्यांनी दीपाली सय्यद यांचे आभार मानले आहेत. यावेळी अभिनेत्री दीपाली सय्यद यांनी पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्त गावापर्यंत कोसो दूर पायी, चिखल दगड दरड धोंड्यातून चालून नागरिकांना भेटून आधार दिला. दीपालीताई सय्यद यांनी कोकणातील पूरग्रस्तांना मदतीचा हात दिला आहे. दरडग्रस्त भागात दर्या, खोर्या, डोंगर माळरान पठार, चिखल दगड धोंडे तुडवीत त्या आपत्तीग्रस्त लोकांपर्यंत पोहचून त्यांना आधार देण्याचे काम करीत आहेत. कोकणातील पूरग्रस्तांना व्यापक स्वरूपाची मदत केली जात असून यामध्ये १ लाख गॅस शेगडी वाटप, १ लाख किराणा कीट चे वाटप, १ लाख साड्या वाटप, १ लाख सॅनिटायझर वाटप, १० लाख ब्लँकेट (चादरी ) तसेच कोलगेट, ब्रश, साबण, कपडे या सर्व वस्तूचे सिने अभिनेत्री दिपाली सय्यद या पूरग्रस्त भागाची पाहणी करताना वाटप करीत आहेत. हे सर्व साहित्य रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील पूरग्रस्त भागातील गावात वाटप करण्यात येत आहे.

# बीसीटी विधी महाविद्यालयातर्फे कायदा तुमच्या दारी वेबिनार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम आयोजित करण्यासाठी सदैव प्रयत्नशील असते. मुंबई विद्यापीठाचा विधी विभाग, महात्मा गांधी काशी विद्यापीठ, विधी विभाग आणि बीसीटी विधी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लिगल एड अवेयरनेस प्रोग्राम २०२१-२२ अंतर्गत लॉ ॲट युवर डोअर स्टेप (कायदा तुमच्या दारी) या अशा सलग चार दिवसांच्या वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.

मुंबई विद्यापीठ, विधी शाखेच्या प्रमुख डॉ. राजेश्री वर्हायडी, महात्मा गांधी काशी विद्यापीठ, वाराणसी, विधी शाखेचे प्रमुख डॉ. रंजन कुमार आणि भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शितला गावंड यांच्या पुढाकाराने ऑनलाइन पद्धतीने, झुम मिटिंगच्या माध्यमातून हे वेबिनार झाले.


पहिल्या दिवशी सर्वोच्च न्यायालाचे माजी न्यायमूर्ती बी. एन. श्रीकृष्ण यांनी या वेबिनारचे उद्घाटन केले. डॉ. राजेश्री वर्हाडी यांनी त्यांचे स्वागत केले, तर डॉ. रंजन कुमार यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्या डॉ. शितला गावंड यांनी मुख्य अतिथी यांची माहिती दिली, तसेच या उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यानंतर श्रीकृष्ण यांनी कायदा आणि समाज या विषयावर विद्यार्थ्यांना आणि उपस्थित सर्वांना मार्गदर्शन केले. मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव बळीराम गायकवाड यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल सर्वांना शुभेच्छा दिल्या.

दुसर्याआ दिवशी मुंबई उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ वकील ॲमड. उदय वावीकर यांनी ग्राहक संरक्षण कायदा आणि त्याचे महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना व्याख्यान दिले. तिसर्यो दिवशी मुंबई उच्च न्यायालयाच्या वकील ॲषड. मृणालिनी देशमुख यांनी घरगुती हिंसाचार कायदा आणि महिलांचे सशक्तीकरण या विषयावर विद्यार्थ्यांना व्याख्यान दिले. शेवटच्या दिवशी मुंबई उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ वकील तथा महाराष्ट्र आणि गोव्याचे विधिज्ञ परिषद उपाध्यक्ष ॲउड. सुदीप पासबोला यांचे विधिज्ञ परिषदेचे अनुशासनात्मक अधिकार आणि जनकल्याण या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. या प्रत्येक व्याख्यानाच्या शेवटी प्रत्येक व्यक्त्याने प्रश्ना-उत्तरे सदरात विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

या कार्यक्रमाकरिता, तसेच न्यायाधीश, वकील, प्राध्यापक, आजी-माजी विद्यार्थी अशा अनेक जणांनी झूम मीटिंगवर प्रत्यक्ष, तर यूट्युब लाईव्हवर अप्रत्यक्ष सहभाग नोंदविला. मुंबई विद्यापीठाचे सहा. प्रा. डॉ. संजय जाधव, डॉ. अलका पाटील यांनी, तसेच बीसीटी विधी महाविद्यालयाचे सहा. प्रा. संघप्रिया शेर, प्रा. कृपा नाईक, प्रा. प्रियांका उंडे, प्रा. निनाद शेंडगे, प्रा. भाग्यश्री पाटील, ग्रंथपाल हिटेश छत्तानी, तसेच विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी सुयश बारटक्के आणि समृद्धी तिवटणे यांनी संयोजनाची जबाबदारी पार पाडली.

चार दिवस चाललेल्या या वेबिनारमध्ये बीसीटी विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसोबतच इतर विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीसुद्धा उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या वेबिनारमध्ये सहभागी होणार्याभस, प्रत्येक दिवशीच्या उपस्थितीबाबत सहभागाचे प्रमाणपत्र ऑनलाइन पद्धतीने देण्यात आले. 'लॉ ॲयट युवर डोअर स्टेप' या मुंबई विद्यापीठाच्या विधी विभागाने सुरू केलेल्या उपक्रमासाठी प्राचार्या डॉ. शितला गावंड यांनी डॉ. राजेश्री वर्हाुडी यांचे, तसेच वेबिनारमध्ये मार्गदर्शन करणारे सर्व व्याख्याते आणि सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

त्याचबरोबर विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा याकरिता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी मार्गदर्शन आणि प्रोत्साहन दिल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख आणि सर्व कार्यकारी मंडळ सदस्यांचे विशेष आभार मानले.




**कागदपत्रे गहाळ**

माझे अशिल श्री.संतोष अनंत पसल्लु, सी-६, सी.जे.मुनोथ नगर, २ रा मजला, पोस्ट ऑफिस जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत असून पनवेल परिसरामध्ये श्रीया वल्लभ को.ऑप.हौ.सोसायटी, तळमजला, रुम नं.४, प्लॉट नं.१२७/४, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड या मिळकतीचे दस्त क्र.पवल-३ १८८८/२०१२ दि.२१/०२/२०१२ गहाळ झाले आहेत. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाणे प्रॉपर्टी मिसिंग रजि नं.१३१६/२०२१ प्रमाणे दि.१५/०७/२०२१ रोजी नोंद केली आहे.

सदरचे दस्ताऐवज कोणाला सापडले असल्यास खालील पत्यावर आणून द्यावीत. अथवा फोन नं.९८२०४०८४७२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

सही/-
अॅड.पुनम अे.खरे
शॉप नं.३, सत्यकृपा को.ऑ.हौ.सो.लि.,
प्लॉट नं.१०३, सेक्टर ९, नवीन पनवेल
(पू.), नवी मुंबई-४१०२०६
मोबा नं.९८२०४०८४७२
ऑफिस नं.०२२-२७४६४५४८



**जाहीर नोटीस**

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, १) श्री.जयप्रकाश वामन पाटील २) श्री.मनोज वामन पाटील राहणार : नावडे गाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतगत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्याकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल मे.सारा रियलिटी तर्फे भागीदार १) ईदरीस ईसहाक पटेल, २) वसिम शब्बीर पटेल पत्ता : शॉप नं.३, एस.एम.एनक्लेव, भूखंड क्र.८, सेक्टर १६, तळोजा फेज २, रायगड ४१०२०८ यांनी त्रिपक्षीय करारनामा /हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशील**
**सिडको फाईल क्रमांक ४२१ तळोजा नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | २ | १७१ | १९९.१२ चौ.मी. पैकी ५० टक्के अविभाज्य भाग |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
अॅड.सुजाता जो. पाटील
विसावा को.ऑप.हौ.सोसा., प्लॉट
नं.ई-१२४/१३ सेक्टर १२, खारघर,
नवी मुंबई-४१०२१०
मो.नं.८८७९४१६४८३



**जाहीर नोटीस**

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, १) श्री मुकेश नारायण भोईर २) श्री हरिभाऊ रामदास नाईक ३) श्रीमती सुजाता नितीन नाईक ४) कुमार विरेन नितीन नाईक ५) कुमारी धृवी नितीन नाईक ६)श्रीमती लीलाबाई नारायण नाईक राहणार : कोल्ही, पोस्ट : पारगाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भुखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात साडेबावीस टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई, कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजुर होऊन करारनामा झाला आहे. वर नमुद शेतकऱ्याकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल मे.मंगलमुर्ती लाईफस्पेसेस तर्फे भागीदार १) मे. एम.एस.डी लाईफस्पेसेस वतीने संचालक श्री.हेमंतसिंग पुरणसिंग मेहरा २) श्री.महेद्र हगमीळाल सुराना पत्ता : प्लॉट नं ३, सेक्टर आर ४, पुष्पक, नवीन वडघर, रायगड यांनी त्रिपक्षीय करारनामा /हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशील**
**सिडको फाईल क्रमांक KOI-ICIG-74**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक (वडघर) | आर ३ | २६९ | ५९० चौ.मी. पैकी ५० टक्के अविभाज्य भाग |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
अॅड.सुजाता जो. पाटील
विसावा को.ऑप.हौ.सोसा., प्लॉट
नं.ई-१२४/१३ सेक्टर १२, खारघर,
नवी मुंबई-४१०२१०
मो.नं.८८७९४१६४८३


# मुंबईतील बैठकीत कार्यकारिणी नियुक्त्या जाहीर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात सक्रिय कार्यरत असलेल्या व्हेंचर फाउंडेशनच्या राष्ट्रीय सचीव-पदी अल्ताफ सय्यद, ठाणे जिल्हा महासचिव पदी विजय केसरकर, मिराभाईंदर अध्यक्ष पदी अनिल बाळापूरे यांची तर ठाणे जिल्हा संयुक्त सचीव पदी अबू खान यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

गेल्या सहा वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सन.२०१५ ते सन.२०२१ सक्रिय कार्यरत असलेल्या व्हेंचर फाऊंडेशनचा संपूर्ण भारतात विस्तार करण्यात येणार येणार असून सदस्य नोंदणी प्रगतीपथावर आहे.देशात एक हजार आरोग्य शिबिराचे उद्दिष्ट असून आतापर्यंत साठहून अधिक शिबिरे घेण्यात आली आहेत.


**IDEAL PALACE Co-operative Housing Society Ltd.**
**आयडियल पॅलेस को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
Regd.No. : REG/BWL/HSG/TC/1841 dated 30-06-2006
Plot No.3, Survey No.746, Sai Nagar Road, Panvel, Raigad-410206

**विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस**

आयडियल पॅलेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सर्व्हे नंबर ७४६, प्लॉट नंबर ३, साईनगर रोड, पनवेल. या संस्थेच्या सर्व सन्माननिय सभासदांना कळविण्यात येत आहे की, आपल्या संस्थेच्या इमारतीच्या पुर्नविकासासंबंधी संस्थेच्या सर्व सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा, **सोमवार दि.३० ऑगस्ट २०२१** रोजी **दुपारी ४.३०** वाजता, कच्छी महेश्वरी समाज हॉल, बंदर रोड, पनवेल या ठिकाणी, **मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल,** यांचेकडील **दिनांक ०५/०८/२०२१** च्या आदेशान्वये नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकारी यांचे उपस्थितीत आयोजित करण्यात आलेली आहे.

तरी सर्व सभासदांनी न चुकता वेळेवर अवश्य उपस्थित रहावे.

**सभेपुढे येणारे विषय**

१) संस्थेच्या पुर्नविकासाबाबत सादरीकरणासाठी निवड केलेल्या निविदासंबंधी तुलनात्मक माहिती देणे.
२) निविदा क्रमाने सादर करणे (निविदांचे सादरीकरण).
३) इमारत पुर्नविकासासाठी एका विकासकाची / कंत्राटदाराची अटी व शर्तीसह नेमणूक करणे व निविदा अंतिम करणे.
४) निवड झालेल्या विकासकाकडून / कंत्राटदाराकडून संमती घेणे.
५) पुढील कामकाजाबाबात माहिती घेणे.

पनवेल
दिनांक : ०९/०८/२०२१

सही/-
सेक्रेटरी
आयडियल पॅलेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

**टिप :-**

१) सर्व सभासदांना कळविण्यात येत आहे की, या सभेस आवश्यक ती गणपूर्ती न झाल्यास ही सभा आठ दिवसांसाठी तहकूब करण्यात येईल. सदरच्या तहकूब सभेस गणपूर्ती न झाल्यास सभासदांना इमारतीच्या पुर्नविकासामध्ये स्वारस्य नाही असे समजून सभा रद्द करण्यात येईल व अशी सभा पुढील तीन महिन्यापर्यंत बोलाविण्यात येणार नाही.
२) सदरहू सभेत फक्त सभासदांनीच उपस्थित रहावे (फोटो आयडी) ओळखपत्र असणे गरजेचे आहे.
३) सदर सभेस मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पनवेल यांचे कार्यालयतील प्राधिकृत अधिकारी उपस्थित राहणार असून सदर सभेचे व्हिडीओ चित्रीकरण होणार आहे.
४) कोरोना प्रार्दुभावामुळे सोशल डिस्टन्सिंगचे पालन करावयाचे असल्याने फक्त एकाच सभासदाने सभेस यावे व सभेत येताना मास्क घालणे बंधनकारक आहे.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**
१) मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनवेल
२) श्रीमती.एन.एम.पुगांवकर सह.अधि. (प्र.श्रे.) प्राधिकृत अधिकारी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पनवेल


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कोलाड-आंबेवाडी नाक्यावर पुराचे पाणी आले नसल्याने पालकमंत्री आदिती तटकरे यांचे मानले आभार

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

पावसाळ्यात जरासे जरी पाणी झाले तरी कोलाड–आंबेवाडी नाका हा नेहमीच जलमय झालेला दिसून येतो.परंतू या वर्षी इतक्या मोठ्या प्रमाणावर पाऊस पडून देखील व ठिकठिकाणी पूर येऊन देखील कोलाड–आंबेवाडी नाक्यावर जराही पुराचे पाणी आले नसल्याने रहिवासी वर्ग व व्यापारी वर्गाला फार मोठा दिलासा मिळाला असल्याचे व याबाबतचे सारे श्रेय कोकणचे भाग्यविधाते तथा रायगडचे खासदार सुनील तटकरे,पालकमंत्री आदिती तटकरे व आ.अनिकेत तटकरे यांना जात असल्याची माहिती तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला अध्यक्षा प्रितम पाटील यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना,कोकणचे भाग्यविधाते व रायगडचे खा.सुनील तटकरे यांच्या विशेष प्रयत्नातून व पालकमंत्री आदिती तटकरे व आ.अनिकेत तटकरे यांनी केलेल्या पाठपुराव्याने कोलाड–आंबेवाडी येथील गोदी नदी पात्रात मोठ्या प्रमाणावर साठलेला गाळ गतवर्षी काढण्यात आला. गाळ काढल्याने नदीपात्राची खोली वाढल्याने मोठ्या प्रमाणावर नदीपात्रात पाणी साठू लागल्याने व पाणी धारण करण्याची क्षमताही वाढल्याने मोठ्या प्रमाणावर पडलेले पावसाचे पाणी नदीपात्रात साठून राहिल्याने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडून देखील त्याचा काहीएक परिणाम नाक्याला झाला नसल्याने ब–याचशा बाबतीत त्याचे सकारात्मक परिणाम सुद्धा दिसून आले. जुलै महिन्यात तिस–या आणि शेवटच्या आठवड्यात चांगलाच मुसळधार पाऊस पडल्याने सर्वत्र पाणीच पाणी झाल्याने बहुतांश भागात पुर देखील आला. परंतु गोदी नदीपात्रातील. साठलेला गाळाची समस्या रहिवासी वर्गाने जिल्ह्याच्या कर्तव्यदक्ष पालकमंत्री आदिती तटकरे व धडाडीचे युवा आ.अनिकेत तटकरे यांनी या समस्येबाबत जातीने लक्ष देऊन व सततच्या केलेल्या पाठपुराव्याने नदीपात्रातील गाळ काढल्याने कोलाड–आंबेवाडी नाक्यावर या वर्षी पुराचे पाणी आले नसल्याने येथील रहिवासी वर्ग व व्यापारी चांगलाच दिलासा मिळाला असल्याने समाधानही व्यक्त करण्यात येत असल्याचे शेवटी अध्यक्षा प्रितम पाटील यांनी माहिती देताना सांगितले.

# आंबेनळी घाट कोसळल्यानंतर आ.गोगावले यांनी पाहणी करून रायगड जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते निर्देश

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**



पोलादपूरपासून प्रतापगडापर्यंत अंदाजे वीस दरडी कोसळल्यानंतर दरडी युद्धपातळीवर हटवण्याच्या कामाची पाहणी करत प्रतापगडाच्या पायथ्याशी वाडा कुंभरोशी गावापर्यंत जाऊन महाड विधानसभा मतदार संघाचे आ. भरत गोगावले यांनी पाहणी केली. त्यावेळीच आ.गोगावले यांनी प्रतापगड परिसरातील नदी पात्रावरील छोटे–मोठे ब्रिज वाहून गेल्यामुळे ३५ गावांचा संपर्क तुटला असल्याचे सांगून सातारा जिल्हा प्रशासनापेक्षा अधिक त्वरेने पोलादपूर व रायगड जिल्हा प्रशासनाकडून मदत कार्य पोहोचू शकेल, अशी माहिती रायगडच्या जिल्हाधिकारी निधी चौधरी यांना देत प्रतापगडाच्या पायथ्याशी वसलेल्या सर्व गावांना तातडीने मदत पोहोचविण्यासंदर्भात निर्देश दिल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

यानंतर रायगड जिल्हा प्रशासनाने पोलादपूर तहसिल कार्यालयामध्ये आपत्ती निवारणकामी प्रतिनियुक्तीवर असलेले पेण येथील प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांच्यामार्फत वेगवान हालचाली करून सर्व संपर्क तुटलेल्या गावांना मदत पोहोचविली होती. त्यामुळे सदर गावांना येणारी मदत पाठवल्यामुळे या भागातील ग्रामस्थांनी आ. गोगावले यांचे आभार मानले.तसेच सदर ग्रामस्थांनी आमदार गोगावले यांच्याकडे गॅस सिलेंडरची गरज व्यक्त केली असता आ.गोगावले यांनी रायगड जिल्हा अधिकारी निधी चौधरी यांच्याकडे फोन करून सदर लागणाऱ्या सिलेंडरची मागणी केली असता १०० सिलेंडर पाठवण्याचे ताबडतोब जिल्हाधिकारी यांनी मान्य केले.

प्रतापगडाच्या पायथ्याशी वाडा कुंभरोशी येथील शासकीय विश्रामगृहामध्ये वास्तव्यास असलेल्या बाधित ग्रामस्थांची यावेळी आ. गोगावले यांनी आस्थेने चौकशी करून आ–पणास लागेल ते सर्व सहकार्य आमदार या नात्याने आपणास करत आहे तसेच कोणतीही अडचण भासली तरी ताबडतोब कळवा. आम्ही आपल्याला मदत करण्याचा नक्कीच प्रयत्न करू. प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या दरडग्रस्त गावांचा जिल्हा जरी सातारा असला तरी महाबळेश्वर घाटामध्ये दरड कोसळल्यामुळे त्याबाजूने शासकीय मदत पोहोचणे मुश्कील आहे. आता प्रतापगड ते पोलादपूरपर्यंत कोसळलेल्या पुष्कळशा दरडी काढण्यात आल्यामुळे अत्यावश्यक सेवा पोहोचविण्याकरीता महाड, पोलादपूर किंवा मुंबईकडे जाण्यासाठी मार्ग खुला करण्यात आलेला आहे, अशी माहिती दिली.

प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांनी रायगड जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या आदेशान–ुसार अतिवृष्टीमध्ये संपर्क तुटलेल्या ३० ते ३५ गावांकरीता आणखी जीवनावश्यक वस्तूंचे कीटची व्यवस्था केली असून शक्य तेवढी मदत करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे आणि आणखी देखील मदत आपणास आम्ही करणार आहोत असे गोगावले यांनी सांगितले. यावेळी आ.भरत गोगावले यांनी पोलादपूर शिवसेना तालुकाप्रमुख निलेश अहिरे, विभाग प्रमुख लक्ष्मण मोरे तसेच प्रतापगड येथील सामाजिक कार्यकर्ते आप्पा उतेकर आणि संजय जाधव यांच्यासमवेत दरडग्रस्त गावांची पाहणी केली.

## २० लाखांचा स्क्रॅपचा माल पाठवत असल्याचे सांगून दोघांनी केली व्यापाऱ्याची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दोन आरोपींनी संगनमत करून सिद्धीविनायक ट्रेडिंग कंपनी व शिवकुमार अग्रवाल यांच्या कंपनीस जवळपास २० लाखांचा स्क्रॅपचा माल पाठवत असल्याचे सांगून त्यांच्याकडून पैसे काढून घेऊन फसवणूक केल्याची घटना तळोजा औद्योगिक वसाहतीत घडली आहे.

शिवकुमार अग्रवाल (वय–५८) यांचे आरोपी प्रदिप व राकेश हे स्क्रॅपच्या व्यवसायाशी संबंधित आहेत. यातील आरोपींनी तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये देवकी नंदन कंपनी याठिकाणी संगनमत करून सिद्धीविनायक ट्रेडिंग कंपनी व श्री स्टिल इंडस्ट्री यांच्या कंपनीस प्रत्येकी २५ टन लोखंडी राऊंड बार हा स्क्रॅपचा माल पाठवत असल्याचे सांगून प्रत्येकाकडून ९, ९७, ६२० रूपये व ९, ९५, ७३१ रूपये असा एकूण १९, ९३, ३५१ रूपयांचा धनादेश स्विकारून या दोघांनाही माल न पाठविल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तळोजा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## कोरोना काळात बंद असलेली पेण-कोपर बससेवा पुन्हा सुरु

**दै.रायगड नगरी । पेण**

कोरोना काळा पासून पेण ग्रामीण विभागातील बंद असलेली पेण – कोपर बससेवा रविवार पासून पुन्हा सुरु करण्यात आली आहे.



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील ग्रामीण भागातील बससेवा जवळपास दीड वर्षे ठप्प झाली होती. यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांना खाजगी गाड्यातून जास्त भाडे देऊन प्रवास करावा लागत आहे. पेण तालुक्यातील कोपर गावातील बस सेवा देखील कोरोना काळात बंद होती.

या बाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे मच्छीमार सेलचे प्रदेशाध्यक्ष चंदू पाटील, उपाध्यक्ष डॉ.रूपेश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसचे मच्छीमार सेलचे जिल्हाध्यक्ष मंगेश कोळी, तालुकाध्यक्ष बिपीन पाटील, विलास कोळी यांनी खासदार सुनील तटकरे व पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या कडे केलेल्या मागणी केली होती. त्यानुसार पालकमंत्री आदिती तटकरे यांनी केलेल्या सूचनेनुसार रायगड परिवहन महामंडळाने पेण – कोपर ही बससेवा पुन्हा सुरु केली असल्याने कोपर, डावरे, वाडा, हनुमानपाडा या ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

# मुरुडमध्ये संत सावतामाळी पुण्यतिथी साधेपणात साजरी

**दै.रायगड नगरी । मुरुड**

सोमवंशीय क्षत्रिय माळी समाज मोठ्या प्रमाणात असलेल्या मुरुड शहरात दरवर्षी संतश्रेष्ठ सावतामाळी जयंती व पुण्यतिथी माळी समाजातर्फे फार मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. यावेळी बहुसंख्येने समाज बांधव उपस्थित असतात.

गतवर्षापासून कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर सर्व कार्यक्रम रद्द करून संत सावतामाळी जयंती व पुण्यतिथी अत्यंत साधेपणात प्रतिमेचे पूजन व पुष्पहार घालून साजरी केली.

शनिवारी झालेल्या संत सावतामाळी पुण्यतिथीनिमित्त माळी समाजाचे अध्यक्ष उल्हास गुंजाळ यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार घालण्यात आला.

यावेळी उपाध्यक्ष महेश कारभारी, सचिव केतन वर्तक , सहसचिव राकेश मसाल, हिशेब तपासनीस आदेश दांडेकर, संकल्प युवा अभियान अध्यक्ष राहुल वर्तक, उमेश भायदे, राजेंद्र दवटे, प्रमोद भायदे, राकेश भगत, दिलीप अपराध, विनोद भगत, प्रमोद मसाल, रोहित ठाकूर इत्यादी उपस्थित होते. यावेळी भजनांचा कार्यक्रम रद्द करून कोरोना संसर्गाबाबत शासनाचे नियम तंतोतंत पाळून संतश्रेष्ठ सावतामाळी पुण्यतिथी अत्यंत साधेपणात साजरी केल्याचे समाज अध्यक्ष उल्हास गुंजाळ यांनी सांगितले.



## महेश साळुंखे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाद्वारे साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांचा वाढदिवस कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी पनवेलसह वडघर, करंजाडे व जिल्ह्यात विविध ठिकाणी सामाजिक उपक्रमाद्वारे साजरा केला. यानिमित्ताने शालेय विद्यार्थ्यांना शालेयपयोगी वस्तूंचे वाटप, वृक्षारोपण, ज्येष्ठ नागरिकांना फळे वाटप करण्यात आले.

---

अर्जदाराचे वकील ॲड.विपुल रमाकांत ठाकूर

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्त्र यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०९/२०२१

१) श्रीमती.औबाई उर्फ आउबाई अंकुश ठाकूर
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.महेश अंकुश ठाकूर
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
वरील १ व २ रा.मु.धुतूम, पो.जासई,
ता.उरण, जि.रायगड ४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. अंकुश पांडुरंग उर्फ दुकल्या ठाकूर यांचे दि.१४/०२/२०२१ रोजी मौजे : धुतूम, ता.उरण, जि.रायगड येथे निधन झाले आहे. अर्जदार हे कै.अंकुश पांडुरंग उर्फ दुकल्या ठाकूर यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.अंकुश पांडुरंग उर्फ दुकल्या ठाकूर यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने सिडकोकरिता भूसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | गावाचे नाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे – सावरखार १५४/८६ | १५४ इ | ११ | १–२०–५ |
| २ | मौजे – मुठेखार १० | १२ | १–ब | ०–१७–५ |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क्र.१ व २ हे कै.अंकुश पांडुरंग उर्फ दुकल्या ठाकूर यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलांमार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.३/०८/२०२१ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण

---

मा.पांडे साहेब कोर्ट
श्री.सचिन बा. कांबळे
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.७९४/२०२१
ने.ता.०९/०९/२०२१

सौ.चंदा सुनील शिरोही उर्फ सुरेही
वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.जे.टी.पाटील निवास रा.मु.पो.खारघर गाव,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल शहर महानगरपालिका
विभाग–खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कुमारी. आरती सुनील शिरोही उर्फ सुरेही हिचा जन्म २५/०१/२०१५ रोजी श्रीमती. चिमाबाई सुनील शिरोही यांच्या चाळीमध्ये मु.पो.खारघर गाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यावेळी राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव आई वडिलांकडून अनावधानाने कुमारी.आरती सुनील शिरोही उर्फ सुरेही यांची जन्माची नोंद करायची राहून गेली आहे. परंतु काही कारणास्तव जन्माची नोंद करून घेणे व जन्माची नोंद कुठे करतात व कशासाठी करून घेतात याची आम्हा आई वडिलांना काही पूर्व कल्पना नव्हती.

तरी अर्जदार यांच्या जन्माची नोंद बद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या मागणी बद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३/३ प्रमाणे जन्माची नोंदणी परवानगीचा अर्जदारांचा अर्जातील मागणी विनंती सिद्ध झाल्यास त्यांना हे जन्माची नोंद मंजूर करेल.

आज दि.०९/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

---

मे.मुजावर सो.
अर्जदारांतर्फे वकील
ॲड.निलम लक्ष्मण पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१००९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/९/२०२१

१) श्रीमती.हिराबाई नारायण ठाकूर
वय : ६५ वर्षे, धंदा : घरकाम
२) सौ.राजश्री नारायण ठाकूर उर्फ
सौ.राजश्री नवनित तांडेल
वय : ४३ वर्षे, धंदा : घरकाम
३) श्री.दिनेश नारायण ठाकूर
वय : ४१ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.प्रवीण नारायण ठाकूर
वय : ३९ वर्षे, धंदा : शेती
सर्व रा.मु.करळ, पो.जेएनपीटी, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ ते ४ यांची आई असून अर्जदार नं.२ ते ४ हे एकमेकांचे सख्खे भाऊ–बहिण आहेत. अर्जदार नं.१ चे पती म्हणजेच अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.नारायण गणपत ठाकूर हे दि.२९/०४/२०२१ रोजी मयत झाले आहेत. सदर मयत नारायण गणपत ठाकूर यांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीची मौजे : न्हावे, ता.पनवेल येथील जमीन मिळकत महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी ''नवी मुंबई'' प्रकल्पाकरिता संपादीत केली आहे. सदर मिळकतीच्या संपादनासंबंधी खालीलप्रमाणे ॲवॉर्ड जाहीर करण्यात आले आहे.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ. क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | सिडको फाईल नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २/९४ | अ | ४६६ | ०–२९–३ | २०२२ |
| २ | | अ | ४७३ | ०–०६–६ | |
| | | | | एकूण क्षेत्र ०–३५.९ | |

आता शासनाने जाहीर केलेल्या साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत सदर मयत नारायण गणपत ठाकूर यांस त्यांच्या वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत नारायण गणपत ठाकूर यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०९ माहे ऑगस्ट सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मे.मुजावर सो.
अर्जदारांतर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०१७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/९/२०२१

१) श्री.प्रकाश मुरलीधर शेट्ये
वय : ५९ वर्षे, धंदा : नोकरी
रा.एच–३२/१, ऑर्डीनन्स ईस्टेट,
अंबरनाथ पश्चिम, ता.अंबरनाथ,
जि.ठाणे, ठाणे ४००६०३
२) श्री.सुनील मुरलीधर शेट्ये
वय : ५५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.जय गणेश को.ऑप.हौ.सो.,
रुम नं.२०१, प्लॉट नं.३९०/ए,
लोकमान्य नगर, बस डेपोच्या मागे,
पनवेल, जि.रायगड ४१०२०६
३) श्रीमती.सुजाता प्रकाश वनगे
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.श्री अपार्टमेंट, ए–१४, शिवसेना ऑफिसच्या मागे,
खोपट, ठाणे (वेस्ट) ४००६०१ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार क्र.१ ते ३ हे एकमेकांचे सख्खे भाऊ–बहिण आहेत. सदर अर्जदारांची आई सुमती उर्फ जनाबाई मुरलीधर शेट्ये पुर्वाश्रमीची जनाबाई दयाराम साखरे या दि.१४/०९/२०१४ रोजी मयत झाले आहेत. सदर मयत सुमती उर्फ जनाबाई दयाराम साखरे यांच्या मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर मयत सुमती जनाबाई मुरलीधर शेट्ये पुर्वाश्रमीची जनाबाई दयाराम साखरे यांच्या सामाईक मालकीची मौजे : ओवळे, ता.पनवेल येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमीन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केली आहे. सदर मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ. क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४/२००० | १७९+१८०+ १८२+१८४ | ५ | १–२१.० | ३=२० |

वर नमूद केलेली मिळकत व सदर मिळकतीच्या संपादनापोटी मिळणारे विविध लाभ सुमती उर्फ जनाबाई मुरलीधर शेट्ये पुर्वाश्रमीची जनाबाई मुरलीधर शेट्ये पुर्वाश्रमीची जनाबाई दयाराम साखरे यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून सदर अर्जदारांस मिळण्याकरिता त्यांनी ते सुमती उर्फ जनाबाई मुरलीधर शेट्ये पुर्वाश्रमीची जनाबाई दयाराम साखरे यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०९ माहे ऑगस्ट सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

ॲड.प्रशांत भुजबळ
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१००४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२४/९/२०२१

१) श्री.यशवंत रामा म्हात्रे
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
२) श्री.रमेश रामा म्हात्रे
वय : ५९ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.बळीराम रामा म्हात्रे
वय : ४९ वर्षे, धंदा : शेती
सर्व रा.जासई, ता.उरण, जि.रायगड
४) श्रीमती.निर्मला लनक्ष्मण कडू
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.९२–अ, वेश्वी, दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
५) श्रीमती.ज्योत्सना कमळाकर पाटील
वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.दिघाटी, पो.केळवणे, ता.पनवेल, जि.रायगड
६) श्रीमती.जयवंती रामनाथ म्हात्रे
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.झिंगारी गल्ली, जासई, ता.उरण, जि.रायगड
७) श्री.श्याम चंद्रकांत ठाकूर
वय : ४१ वर्षे, धंदा : शेती
रा.न्हावाखाडी, ता.पनवेल, जि.रायगड
८) श्रीमती.प्रमिला देवानंद तांडेल
वय : ३७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१८१–बी, मराठी शाळेजवळ,
करळ, ता.उरण, जि.रायगड
९) श्रीमती.कामिनी संजय म्हात्रे
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मोरावे, ता.पनवेल, जि.रायगड
१०) श्रीमती.स्वाती श्रीकृष्णा ठाकूर
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.६५९, जरीमरी मंदिराजवळ,
शिवाजीनगर, गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. गिरजाबाई रामा म्हात्रे यांचे निधन दि.१२/११/२०२० रोजी झालेले आहे. तसेच कै.गिरजाबाई रामा म्हात्रे यांची मुलगी कै.सावित्रीबाई चंद्रकांत ठाकूर यांचे निधन दि.०५/११/२००० रोजी झालेले असल्याने श्री.यशवंत रामा म्हात्रे, वगैरे ह्यांनी कै.गिरजाबाई रामा म्हात्रे यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मौजे : कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नांव | यु. केस नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| कुंडेवहाळ | | ११ | २ | ०–५४–९ | १४.५० |
| कुंडेवहाळ | | २८ | ५ अ | ०–०५–१ | ०.८४ |
| कुंडेवहाळ | | ७८ | ६ अ | ०–००–५ | ०.०९ |

सदर संपादीत मिळकतींपोटी सिडकोकडून २२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडको फाईल नं.४८ अंतर्गत दि.२४/१०/२०१६ रोजीच्या सोडतीद्वारे मौजे : पुष्पकनगर–दापोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड नं.१३, सेक्टर नं.२, क्षेत्र ९६० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड कै.गिरजाबाई रामा म्हात्रे व इतर यांना वितरित करण्याचे इरादीत करण्यात आलेले आहे.

श्री.यशवंत रामा म्हात्रे, वगैरे हे कै.गिरजाबाई रामा म्हात्रे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.यशवंत रामा म्हात्रे, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.गिरजाबाई रामा म्हात्रे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०९/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## महेंद्र पाटील यांनी मातोश्री लतिका पाटील यांच्या स्मरणार्थ पूरग्रस्तांना केली मदत

**दै.रायगड नगरी । माणगाव**

ठाणे येथील इन्कम टॅक्स डिपार्टमेंट ऑफिसर महेंद्र पाटील यांनी त्यांच्या मातोश्री कैलासवासी लतिका पाटील यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त महाड तालुक्यात तील पूरग्रस्तांना विविध जीवनोपयोगी वस्तूंचे वाटप केले.

यामध्ये कोंडीवते याठिकाणी कपडे, किराणा, बिस्किट, पाणी इत्यादीचे वाटप करून गावकऱ्यांना मदत केली. यावेळी त्यांच्यासोबत वैभव पाटील, निलेश पवार, संतोष गुडेकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. आपल्या आईच्या प्रथम स्मृतिप्रीत्यर्थ महेंद्र पाटील यांनी पूरग्रस्तांना केलेल्या मदतीचे कौतुक होत आहे.



## पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व दुकाने सकाळी ७ ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरु ठेवण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोलीसह पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व दुकाने ( व्यवसाय ) सकाळी ७ ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची मागणी नगरसेवक रविंद्र भगत यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे केली आहे.

पनवेल महानगरपालिका आज घडीला कळंबोली क्षेत्रातील सातत्याने नागरिक पूर्ण वेळ दुकाने सुरू ठेवण्यासाठी सातत्याने आमच्याकडे तक्रार करत आहेत दोन वर्षभरापासून कोणच्यप्रादुर्भावामुळे बहुतांश व्यवसाय बंद पडळे आहेत त्यामुळे दुकानदार कर्जबाजारी झाले असल्याने त्यांना दुकाने बंद करून आपआपल्या गावी जावे लागले आहे नागरिकांना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या आहेत.

तसेच सध्याच्या घडीला पूर्णवेळ व्यवसाय करू शकले नसल्याने त्यांचे भाडे कामगारांचे पगार देणे मुश्कील झाल्याने सदर व्यवसाय बंद पडण्याच्या घडीला आहेत तरी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाले असल्याकारणाने सकाळी सात रात्री आठ वाजेपर्यंत दुकाने सुरु ठेवण्याची मुभा देण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## साईनगर-कर्नाळा स्पोर्टला जोडणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू, नागरिकांनी मानले प्रितम म्हात्रे यांचे आभार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

साई नगर येथून कळंबोली ला कर्नाळा स्पोर्ट्स मार्गे जाण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या अंतर्गत कच्चा रस्ता आहे. सदरचा रस्त्याच्या आजूबाजूला अपटाऊन अवेन्यू , सुशील ब्लॉसम, दुर्वांकुर, सुशील रुक्मिणी इमारती आहेत सदर इमारतीत एकंदरीत हजार ते बाराशे लोकवस्ती आहे. तसेच सदरचा रस्ता साईनगर वासियांना पनवेलच्या बाहेर जाण्यासाठी सोयीचा असल्याने या रस्त्यावर सतत रहदारी असते. रस्ता दुरुस्तीचे काम सुरू केले त्यामुळे तेथील रहिवासी यांनी विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांचे आभार मानले.



परंतु पावसाळ्यात सदर रस्त्यावर आजूबाजूच्या प्लॉटवरील पाणी साचत असल्यामुळे बरेच ठिकाणी रस्ता फुटलेला आहे, त्यामुळे त्या ठिकाणी पावसाचे पाणी साचून अपघाताचे प्रमाण वाढले आहे. तेथे राहणाऱ्या रहिवासीयांनी पत्राद्वारे विरोधी पक्षनेते श्री प्रीतम जनार्दन म्हात्रे आणि पनवेल महानगरपालिका यांना सदरची समस्या सांगितली. त्यात त्यांनी या रस्त्यावरील खड्ड्यांच्या समस्येकडे लक्ष घालून सदर खड्डे त्वरित भरून देण्यास सहकार्य करून त्या विभागातील रहिवाशांची सदर रस्त्यावरील प्रवासादरम्यान होणारी गैरसोय टाळावी अशी विनंती केली.

रहिवाशांनी केलेल्या मागणीला त्वरित प्रतिसाद देत विरोधी पक्षनेते प्रीतम जनार्दन म्हात्रे यांनी संबंधित विभाग अधिकाऱ्यांकडून सदर रस्त्याची पाहणी करून नागरिकांना होणारी गैरसोय लवकरात लवकर दूर करावी अशी सूचना केली. त्यानुसार पनवेल महानगर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सदर ठिकाणी पाहणी केली याप्रसंगी स्थानिक रहिवासी शेकाप युव-ानेते मंगेश अपराज, अविनाश मकास, रोहन गावंड, भाई म्हात्रे, अशोक म्हात्रे व सोसायटी मधील रहिवासी उपस्थित होते. रस्ता दुरुस्तीचे काम सुरू केले त्यामुळे तेथील रहिवासी यांनी विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांचे आभार मानले.

## रस्त्यांचे नामकरण करताना त्या व्यक्तींचे माथेरानसाठी योगदान महत्त्वाचे



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान हे एक सुंदर पर्यटनस्थळ असून दरवर्षी लाखो पर्यटकांची इथे आवर्जून हजेरी असते. सन १८५० च्या दशकात स्थापन करण्यात आलेल्या या ठिकाणाला ब्रिटिश राजवटीत एक अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त आजही कायम आहे. मुंबई पासून अगदी जवळचे ठिकाण असल्याने एकप्रकारे हे स्थळ पर्यटकांसाठी वरदान ठरले आहे अनेकांना या छोट्याशा ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. इतकेच नव्हे तर तालुक्यातील असंख्य परिवार याच स्थळावर आजही अवलंबून असून आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवत आहेत.

ठाण्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी सर ह्युज मॅलेट यांनी खऱ्या अर्थाने या स्थळाला त्याकाळी प्रकाश झोतात आणले होते.सुंदर नैसर्गिकरित्या शुद्ध वातावरण निर्मिती आणि स्वच्छ हवा त्यातच मोटार वाहनांची वर्दळ नसल्याने प्रदूषण मुक्त असल्याने देशविदेशातील पर्यटक इथे आवर्जून भेटी देत असतात त्यामुळे हे पर्यटनस्थळ जगप्रसिद्ध आहे. त्याकाळी इथल्या एकूणच बावन्न किलोमीटर परिसरात निर्माण केलेल्या पॉईंट्स त्याचप्रमाणे रस्त्यांना अनेक मान्यवरांची नावे देण्यात आली आहेत तर स्वातंत्र्या नंतर देशसेवेसाठी महत्व-पूर्ण योगदान देणाऱ्या विभूतींची नावे सुध्दा विविध रस्त्यांना दिली गेली आ-हेत.नजीकच्या काळात एका शासकीय अधिकाऱ्यांचे नाव सुध्दा येथील एका रस्त्याला देण्यात आले आहे त्यांनी केवळ दोन वर्षे मुख्याधिकारी पद उत्तम प्रकारे सांभाळले होते आणि त्यांच्याच कार्यकाळात अनेक विकास कामे मार्गी लावण्यासाठी पुरेपूर प्रयत्न केले गेले आणि त्याचा फायदा माथेरानच्या विकास कामासाठी मोठया प्रमाणात झाला होता.


परंतु आगामी काळात सुध्दा काही रस्त्यांचे अशाप्रकारे नामकरण करण्यात येणार असल्याचे समजते आहे ज्यांनी फक्त आपल्या एकाच समाजासाठी भरीव योगदान दिले आहे ज्यांनी या गावासाठी किंवा स्थानिक नागरिकांच्या भल्यासाठी काहीच कामे केली नाहीत अशा व्यक्तींचे नाव देण्याचा प्रयत्न केला जात आहे हे योग्य नसून संबंधित व्यक्तींच्या माध्यमातून या संपूर्ण गावासाठी इथल्या शैक्षणिक उपक्रमात योगदान, त्याचप्रमाणे विकासासाठी आवश्यक ती मदत करणे गरजेचे होते इथल्या पर्यटन वाढीसाठी खारीचा वाटा नसताना केवळ एका विशिष्ट समाजासाठी मदत केली म्हणजे गावासाठी सहकार्याची भूमिका घेतली आहे हे सपशेल चुकीचे असून अशाप्रकारे जर कुठल्याही रस्त्याचे नामकरण केले गेले तर ते अशोभनीय आहे असे स्थानिक पातळीवर बोलले जात आहे त्यामुळे नगरपरिषदेने ठराव मंजूर करताना साधकबाधक विचार करून निर्णय घेणे आवश्यक आहे उगाच कुणाच्याही सांगण्यावरून अथवा काही आमिषापोटी ज्यांचे शून्य योगदान आहे अशांची नावे रस्त्याला देणे म्हणजे एकप्रकारे हास्यास्पद बाब आहे असेही जेष्ठ नागरिकांमधून बोलले जात आहे.

## गणेशमूर्ती बनविण्यात मुर्तिकार मग्न ; अनेक कलाकारांना रोजगार

**दै.रायगड नगरी । तळा**

हिंदु धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेले महाराष्ट्राच लाडकं दैवत समजल्या जाणाऱ्या श्री गणेशोत्सव अवघ्या महिन्यांवर येऊन ठेपला असल्याने तालुक्यातील सरस्वती गणेश कला मंदिर, श्रीअनंत कला मंदिर, श्रीकृपा गणेश चित्र मंदिर या कारखान्यामधून प्रतिवर्षी साडे तीनहजार गणपती मुर्ती गौरी, शंभर दुर्गादेवीच्या मुर्ती मूर्तिकार मूर्ती बनविण्यात मग्न झाले आहेत.

पद्मासनी, टिटवाळा, लालबागचा राजा, दगडुशेठ हलवाई, पेशवाई, बालमुर्ती अशा विविध प्रकारच्या मूर्ती बनवले जातात. यामुळे अनेक कलाकारांना रोजगार उपलब्ध होणार आहे. गणेशोत्सव म्हटलं की लाखोंच्या संख्येने चाकरमानी आपल्या गावाकडे लाडक्या गणरायाच्या स्वागतासाठी येत असतात. चाकरमानी आदल्या वर्षीच आपल्या मूर्तीची ऑर्डर देऊन ठेवतात. त्यामुळे पावसाळा सुरू झाला की मूर्तिकार मुर्ती घडविण्यात मग्न होतो. व मूर्त्यांची ऑर्डर पूर्ण करण्यासाठी त्याला कलाकार कामगारांची गरज लागते. त्यामुळे अनेकांना रोजगार उपलब्ध होतो. दरवर्षी प्रमाणे यंदाही शाडू मातीच्या किमतीत दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. तसेच रंग, साहित्य, कारागीर मजूरीत वाढ झाली आहे. तसेच प्लँस्टर ऑफ पॅरिसच्या किमती भरमसाठ वाढल्या आहेत. पेण येथून कच्चा माल आणावा लागत असून पेट्रोल डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे गाडी भाड्यात तसेच मूर्त्यांच्या किमतीत देखील वाढ झाली आहे. पावसाने विश्रांती घेतली असल्यामुळे सर्व मूर्त्यांना सुखावून बॉडी कलर मारण्यात आले आहे. तसेच दोन दिवसांतच पूर्णतः रंगकामाला सुरुवात करणार आहोत. हल्लीच्या वाढत्या महागाईत कारखाने चालवणे परवडत नसले तरी आम्ही हा वारसा पुढे चालवत आहोत. कोरोना पार्श्वभूमीवर शासनाने चार फूट उंचीची परवानगी असल्याने अधिक उंचीच्या मुर्ती पडून राहील्या आहेत. त्यामुळे नवीन मुर्त्या बनवाव्या लागल्या आहेत वाढत्या महागाईचा फटका यंदाही गणेश भक्तांना बसणार असला तरी गणेशोत्सवात याचा कोणताही परिणाम होणार नाही. गणेशोत्सव हा कोकणातला महत्वाचा सण आहे. कोकणातील भक्तगण महागाई असूनही भक्तगण हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करतात. अकरा दिवस गणरायाची मनोभावें पूजाअर्चा दोन टाईम नित्य नेमाने आरती केली जाते. रात्रीच्या समयी भजन आटोपल्यावर पारंपारिक गाण्यांवर ठेका धरला जातो. त्यामुळे भक्तीमय वातावरण निर्माण होते. विसर्जनाच्या दिवशी बाप्पाला भावपूर्ण निरोप देऊन पुढल्या वर्षी लवकर या अशी विनंती करून चाकरमानी पुन्हा परतीच्या प्रवासाला लागतात.



## शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे पुण्यस्मरण दिन संपन्न

**दै.रायगड नगरी । महाड**

न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज रावढळच्या प्रांगणात शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे पुण्यस्मरण दिन उत्साहात संपन्न करण्यात आला. प्राचार्य धर्मरक्षक डी.एल., जाधव एस.व्ही., जाधव आर. एस., रेशीम एम.आर. यांनी बापूजी व संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

प्राध्यापक देशपांडे यांनी शिक्षण महर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या जीवन चरित्राची माहिती दिली. प्रा.कळसाईत यांनी शिक्षणाचे महत्त्व या विषयावर विचार प्रकट केले. सातपुते यांनी शिक्षण व समाजाची उन्नती या विषयावर तर महाजन यांनी विद्यार्थी, पालक, शिक्षक यांची जबाबदारी या विषयावर विचार व्यक्त केले.

मुल्ला यांनी तर मेंडके यांनी शिक्षण ज्ञानअमृत या विषयावर काव्य गायन सादर केले. प्राचार्य धर्मरक्षी यांनी शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे कार्य कधीच जनमानसातून पुसले जाणार नाही असे यावेळी प्रतिपादन केले.

## खानाव येथील डम्पिंग ग्राऊंडला मनसेचा विरोध, ग्रामस्थांना सहकार्य करणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालीका हद्दीतील घनकचरा व्यवस्थापन प्रक्रीया करण्याकामी शासनाकडून खानाव येथील गट क्र.८३ अ ही जागा मिळव्याबाबत व शासन निर्देशित विकसीत करण्याबाबतची माहीती मिळाल्यानांतर खानाव ग्रामस्थांनी याला विरोध केला आहे. यात आता मनसेने उडी घेतली असून मनसेचे उपतालुका अध्यक्ष दिनेश मांडवकर, विश्वास पाटील यांनी पालिकेला निवेदन देत खानाव येथे होत असलेल्या डम्पिंग ग्राउंडला विरोध केला आहे.



पनवेल तालुक्यातील खानाव, मोरबे- कोडले, चिंचवली व वाकडी हा निसर्गरम्य असा परिसर आहे. या पंचक्रोशीत मोरबे धरण आहे. खानाव गावाजवळून नदी वाहते. ती केवाळे येथे गाढी नदीला येऊन मिळते. नदीचे पाणी नियमित वापरासाठी, जनावरांसाठी व शेतीसाठी उपयोगात येते. खानाव येथे प्रस्तावित डंपिंग ग्राउंड झाल्यास नदी, विहीरी व बोअरवेलचे पाणी दुषित होण्याची ग्रामस्थांना भीती आहे. तसेच प्रदुषण व दुर्गंधी मुळे येथील नागरिकांना विविध आजारांना सामोरे जावे लागेल. वरील संदर्भात खानाव ग्रामपंचायतीला तसेच नागरिकांना कोणतीही माहीती दिलेली नसल्याचा आरोप करण्यात आ-लेला आहे. खानाव ग्रामपंचायतीने ग्रामसभेत सदर प्रस्तावास विरोध दर्शवून ठराव संमत केला आहे. तरि पनवेल महानगरपालीका यांचे प्रस्ताव असलेले मौजे खानाव येथील डम्पिंग ग्राऊंड रद्द करण्यात यावे याविषयी पनवेल - मनसे खानाव पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील असे निवेदन पनवेल पालिकेला देण्यात आले आहे. यावेळी उप तालुका प्रमुख दिनेश मांडवकर, नेरे विभाग अध्यक्ष विश्वास पाटील, विकास वारदे आदी उपस्थित होते.

## जागतिक आदिवासी दिन कर्जत तालुक्यात मोठ्या जल्लोषात साजरा

**दै.रायगड नगरी । कर्जत**

जागतिक आदिवासी दिन हा कर्जत तालूक्यातमध्ये मोठ्या जल्लोषामध्ये साजरा करण्यात आला. यावेळी माथेरान कमाणी येथे हुतात्मा विर भाई कोतवाल, हिराजी पाटील यांच्या पुतळ्याला हार अरपण करून कोतलवाडी येथे नाग्या महादू कातकरी यांच्या पुतळ्याला हार अरपण करून नेरळ शिवाजी महाराज हार घा-लून घोषणा चारणी अभिवादन करून येथून कशळे येथे रवान झाली.



कशळे या ठिकाणी आदिवासी समाजातील पारंपरीक नृत्य सादर करण्यात आले यावेळी आदिवासी समाजातील पारंपरी नृत्य धांबडी नृत्य व महिलांचा फुगडी नृत्य सादर करण्यात आली. येथे आदिवासी समाजातील लोकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला व येथे बहू संखेने आदिवासी समाजा उपस्थित होता. हा कर्याक्राम कशेळेच्या नाक्यावर मोठ्याप्रमाणात साजरा झाला. व कळंबच्या नाक्यावर आदिवासी कला कृत्य पारंपरिक पद्धतीने साजरा केला यावेळी रायगड जिल्हा परिषदचे उपाध्यक्ष सुधाकर घारे व रायगड जिल्हा माजी समाज कल्याण सभापती नारायण डामसे , रायगड जिल्हा सदस्य रेखाताई देसले, भास्कर देसले यावेळी उपस्थित होते.

तसेच आदिवासी समाजातील रायगड जिल्हा आदिवासी सेवा संघ रायगड जिल्हा अध्यक्ष बूधाजी तात्या हिंदोळे, कर्जत तालूका अध्यक्ष जैतू पारधी रायगड जिल्हा आदिवासी सेवा संघ सचिव गणेश पारधी, विलस भाला, नामदेव निरगूडा, राजेंद्र निरगूडा, बाळू ठोंबरे यांच्या नियोजन केले या कार्यक्रमाचा शेवट हा ओलमण या ठिकाणी करण्यात आला

### महाड आणि पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्त नागरिकांच्या कुटुंबियांना

## मानसिक आधार देण्यासाठी सरसावली जिल्हा आरोग्य रुग्णालयाची मानसोपचार तज्ञांची टीम

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाड व पोलादपूर तालुक्यात दि.२२ जुलै २०२१ रोजी दरड कोसळून तळीये, साखर सुतारवाडी व केवनाळे येथील नागरिक मृत्यूमुखी पडले. संपूर्णत: गाव आणि आजूबाजूच्या परिसरातील गावांवर शोककळा पसरली. मात्र या संकटात सापडलेल्या आणि मानसिकदृष्ट्या धक्का बसलेल्या नागरिकांना मानसिक आधार देण्यासाठी, त्यांचे समुपदेशन करण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयातील मानसोपचार विभागातील मानसोपचार तज्ञ डॉ. अमोल भुसारे यांच्या मार्गदर्शनाखाली मानसोपचार तज्ञांची टीम पुढे सरसावली.



या मानसोपचार विभागाच्या तज्ञ सदस्यांनी सर्वप्रथम पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्त गावांना भेट देण्यासाठी ग्रामीण रुग्णालय, पोलादपूर येथे जाऊन वैद्यकीय अधीक्षक डॉ. भाग्यरेखा पाटील यांची भेट घेतली आणि तेथून पोलादपूर वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेश शिंदे, राजेश वसावे व नवाळे यांना सोबत घेऊन आधी साखर सुतारवाडी येथे भेट दिली. तेथे एकूण ६५ लोकांचे समुपदेशन केले व त्यांना औषधोपचार दिले. त्यानंतर आंबेमाची गावात भेट देऊन त्या गावातील २२ नागरिकांचे समुपदेशन केले आणि शेवटी केवनाळे गावात जाऊन तेथील ८ नागरिकांचे समुपदेशन केले. तसेच या पथकाने दरडग्रस्त तळीये गाव व आसपासच्या परिसरातील नागरिकांची भेट घेतली. तत्पूर्वी त्यांनी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.बिराजदार यांच्याशी तळीये गाव आणि तेथील परिस्थितीबाबत सविस्तर चर्चा करून माहिती घेतली होतीच. तळीये गावात पोहोचून तेथील प्रत्येक नागरिकांकडे झालेल्या घटनेबद्दल विचारपूस करून झालेल्या घटनेच्या धक्क्यातून सावरण्यासाठी ५५ लोकांना मानसशास्त्रीय समुपदेशन केले आणि ३२ लोकांना आवश्यक ते मानसोपचार देण्यात आले, ज्यात गावातील ग्रामसेवक, सरपंच आणि महसूल विभागातील कर्मचाऱ्यांचाही समावेश होता.

हे सर्व नागरिक झालेल्या घटनेचे प्रत्यक्ष साक्षीदार असून यातील काही लोकांनी आपले नातेवाईक गमावले आहेत. काहींनी आपले घर गमावले तर काहींनी आपली जनावरे गमावली. मात्र या नागरिकांना वस्तूरुपी मदत मोठ्या प्रमाणात प्राप्त झाली आहे. परंतु त्यांना खरी गरज आहे ती मानसिक आधाराची आणि बळाची. मानसोपचार आणि समुपदेशनामुळे त्यांना या परिस्थितीतून बाहेर निघण्यासाठी बळ मिळेल, यासाठी हे मानसोपचार पथक सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत.